| | | | |
|---|---|---|---|
| MHGA010008032025 | दाखल तारीख | : | २४/०९/२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | २४/०९/२०२५ |
| | निकाल तारीख | : | २२/०४/२०२६ |
| | कालावधी | : | ०० व. ०६ म. २९ दि. |
| | **निशाणी क्र. ३२** | | |

**नमुना क्र. ३२**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**

**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(i)]**

| | | |
|---|---|---|
| | **गडचिरोली येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात**<br>**पिठासन अधिकारी : श्री विश्वास एस. खोत**<br>**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**<br><br>**न्यायनिर्णयाचा दिनांक : २२/०४/२०२६**<br>**विशेष बाल संरक्षण खटला क्र. ६०/२०२५** | |
| | अपराध क्र. : ००४/२०२५<br>पोलीस ठाणे : कोटगुल, तहसील कोरची, जिल्हा गडचिरोली | |
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, कोटगुल,<br>ता. कोरची, जिल्हा - गडचिरोली |
| अभियोग पक्षातर्फे | | विद्वान लोकअभियोक्ता श्री.एस.यु. कुंभारे |
| **आरोपी** | | **निकेश हरिदास कराडे**<br>वय १९ वर्षे, धंदा -शेती,<br>राहणार पाटीलटोला, ता. कोरची,<br>जिल्हा - गडचिरोली. |
| आरोपीतर्फे | | विद्वान विधिज्ञ श्री पी.पी. ब्राम्हणवाडे |

**भाग 'ब'**

**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(ii)]**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | ०१/०४/२०२५ ते २६/०७/२०२५ |
| पहिली खबरची तारीख | २७/०७/२०२५ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्राची तारीख | २३/०९/२०२५ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | १२/०३/२०२६ |
| जबाब नोंदणी सुरु झाल्याची तारीख | १६/०४/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ---- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २२/०४/२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रक्रिया सुरु असताना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा कालावधीचा फौ. प्र.सं.च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **आ. १** | **निकेश हरिदास कराडे** | २७/०७/२०२५ | २०/०९/२०२५ | भान्यासं, २०२३ क. ६४(२)(आय)(एम) सह कलम ४, ६ बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ | निर्दोष मुक्त | ... | ... |

**भाग 'क'**

**[फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४(iii)]**

**सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| **ससा१** | पिडिताची आई | फिर्यादी |
| **ससा२** | पिडीता | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| **स्थान** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | --निरंक-- | |

**सरकारपक्ष / बचाव / न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | निशाणी स-१८ /ससा१ | फिर्याद |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | २० | गुन्हयाच्या तपशीलाचा नमुना |
| २. | २२ | फॉर्म ब |
| ३. | २४ व २५ | ओळखीचे फार्म |
| ४. | २६ ते २९ | प्रादेशिक न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर येथील पोचपावती |

**ड. महत्त्वाचे वस्तु :**

| अ.क्र. | महत्त्वाच्या वस्तुंचे क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | .. | .. |

**मौखिक न्यायनिर्णय**

(दिनांक २२/०४/२०२६ रोजी घोषीत)

१) अभियोग पक्षाने हा खटला भारतीय न्याय संहिताचे कलम ६४(२)(आय)(एम) सह कलम ४, ६ बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ अंतर्गत दाखल केलेला आहे.

२) अभियोग पक्षाच्या खटल्यातील तथ्ये खालील प्रमाणे वर्णीता येईल.

अभियोग पक्षाच्या कथनानुसार घटना ही सन २०२५ मध्ये घडली. या घटनेचा रिपोर्ट फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन कोटगुलला दि.२७.०७.२०२५ रोजी दिला. फिर्यादीच्या कथनानुसार ती, तिचा पती, मुलगा व पिडीता यांचेसोबत राहते. ती शेतीचे काम करुन तिच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करते. तिच्या पतीची चुलत बहिण नामे वनीता ही मौजा पाटीलटोला, ता. कोरची, जिल्हा गडचिरोली येथे राहते. तिचा मुलगा नामे निकेश व त्यांच्या परिवाराचे संबंध असल्यामूळे फिर्यादीची मुलगी ही त्यांचे घरी राहत होती. फिर्यादीची मुलगी दोन-तीन वेळा १५ ते २० दिवसांकरीता तिथे गेली व राहीली. फिर्यादीला दिनांक २६.०७.२०२५ रोजी पोलीस स्टेशन कोटगुल येथून फोन आला व तिला व तिच्या मुलीला पोलीस स्टेशन येथे बोलावले. फिर्यादी निकेशच्या घरी मुलीला घेण्याकरीता गेली, त्यावेळी निकेश हजर नव्हता. तिची मुलगी घरीच हजर होती. तिच्या मुलीने सांगीतले की प्राथमिक आरोग्य केंद्र कोटगुल येथील डॉक्टरने तिची लघवी तपासणी करीता घेतली होती. तपासणी झाल्यानंतर ती दोन महिण्याची गर्भवती असल्याचे डॉक्टरांनी सांगीतले. तिच्या मुलीने हे देखील सांगीतले की तिचे निकेशसोबत प्रेमसंबंध असल्यामूळे ती गर्भवती झाली. फिर्यादीला ही माहिती मिळताच फिर्यादीने पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला की तिच्या मुलीचे वय कमी असतांना देखील तिच्या मुलीसोबत शारीरिक संबंध करुन निकेशने तिला गर्भवती केले. पोलीसांना रिपोर्ट

मिळताच पोलीसांनी कारवाई सुरु केली व रिपोर्ट टंकलिखीत करुन घेतला. पोलीसांनी निकेशला अटक केली व त्याला आरोपी बनविले. पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. पोलीसांनी पिडीतेला वैद्यकीय तपासणीकरीता पाठविले व तिची वैद्यकीय तपासणी करुन घेतली. पोलीसांनी अभ्रकाचा डीएनए सॅंपल मिळविण्याकरीता पत्र दिले व सॅंपल प्रादेशिक न्याय सहाय्यक प्रयोगशाळा, नागपूर येथे पाठविले. पोलीसांनी पिडीतेचे जन्म प्रमाणपत्र प्राप्त केले व तिचे बयाण विद्यमान न्यायदंडाधिकारी कुरखेडा यांचेकडून कलम १८३ भा.ना.सु.स. अंतर्गत नोंदवून घेतले. पोलीसांनी चौकशी करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

३) पोलीसांनी दोषारोपपत्र सादर केल्यानंतर या गुन्हयाची दखल घेण्यात आली व आरोपीला समन्स जारी करण्यात आले. आरोपी न्यायालयात हजर झाला. न्यायालयाने दोषारोपपत्र व ईतर कागदपत्र लक्षात घेवून निशाणी क्र.१२ प्रमाणे आरोप निश्चित केले व ते आरोपीला वाचून दाखविले व समजावून सांगीतले. आरोपीने गुन्हा मान्य केला नाही व निर्दोष असल्याचे सांगीतले. आरोपीने त्याच्या बचावाकरीता साक्षीदार तपासले नाही. आरोपीविरुध्द काही अंशी पुरावा मिळून आल्याने कलम ३५१ भा.ना.सु. सं. प्रमाणे त्याची तपासणी करण्यात आली. आरोपीने तपासणीदरम्यान संपूर्ण नकाराचा बचाव घेतला. या खटल्याचे कामकाज दोन्ही पक्षाच्या युक्तिवादाने संपले.

४) खालील मुददे माझे विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुदद्यांना मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह उत्तरे नोदविले आहे. ती खालील प्रमाणे आहे.

| | **वादबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगाने हे सिध्द केले आहे की आरोपीने दिनांक ०१.०४.२०२५ ते २६.०७.२०२५ या दरम्यान मौजा पाटीलटोला, ता. कोरची, जिल्हा गडचिरोली येथे त्याच्या घरामध्ये पिडीतेवर वारंवार ती अल्पवयीन असतांना व ती अल्पवयीन असल्याचे माहित असतांना देखील बलात्कार केला ज्याला ती सहमती देवू शकत नव्हती व अशा कृत्याद्वारे आरोपीने भारतीय न्यायसंहिता कलम ६४(२)(आय)(एम) अंतर्गत अपराध केला ? | ..नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगाने हे सिध्द केले आहे की वरील कालावधीत ठिकाणी आरोपीने पिडीतेवर लैंगिक व गंभीर लैंगिक हल्ला केला व त्याद्वारे त्याने कलम ४ व ६ बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ प्रमाणे अपराध केला ? | ..नाही |
| ३. | कोणता आदेश ? | अंतीम आदेशाप्रमाणे |

## कारण मिमांसा

### वादबिंदु क्र. १ ते ३ बाबत

५) अभियोग पक्षाने हा खटला आरोपी विरुध्द न्याय प्रविष्ट केलेला आहे. भारतीय साक्ष अधिनियम नुसार गुन्हा सिध्द करणे, हे अभियोगाचे काम व जबाबदारी आहे. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता दोन साक्षीदार तपासले. आरोपीने बचावा प्रित्यर्थ साक्षदार तपासलेला नाही. अभियोगाने सर्वप्रथम पिडीतेच्या आईला तपासले. तिने निशाणी क्र.१७ नुसार साक्ष दिली. तिने तिच्या साक्षीत सांगीतले की पिडीता तिची मुलगी आहे व आरोपी तिचा भाचा आहे. पिडीता आरोपीच्या घरी गेली व गर्भवती राहीली. पोलीसांनी तिचे बयाण घेतले होते. तिची मुलगी सन २००६ मध्ये जन्मली. साक्षीदार क्र.२ पिडीताने सांगीतले की आरोपी तिच्या आत्याचा मुलगा आहे व त्यांचे प्रेमसंबंध होते. प्रेमसंबंधातून ती गर्भवती राहीली. ती सन २००६ मध्ये जन्मली व तिची जन्मतारीख १६.१०.२००६ आहे.

६) साक्षीदारांचा उलट तपास घेण्यात आला. साक्षीदार क्र.१ हिने हे नाकारले की तिच्या मुलीचा जन्म १६.१०.२०११ रोजी झाला. तिच्या मुलीचे व आरोपीचे लग्न होणार आहे. पोलीसांनी तिच्या बयाणात काय लिहीले तिला माहित नाही. साक्षीदार क्र.२ हिने सांगीतले की तिचे आरोपीशी प्रेमसंबंध होते. आरोपीविरुध्द तिची तक्रार नव्हती. त्यांचे शरीरसंबंध तिच्या वयाच्या १८ व्या वर्षानंतर झाले.

७) या खटल्यात अभियोगाने दोन साक्षीदार तपासले व दोन्ही साक्षीदारांनी अभियोगास सहाय्य न केल्याने अभियोग पक्षाचा खटला कमकुवत झाला आहे.

पिडीताने हे नाकारले की घटनेच्या वेळी ती अल्पवयीन होती. अभियोगाने जन्म प्रमाणपत्र सादर केले, परंतु अभियोग साक्षीदाराने जन्मतारीख नाकाल्यामूळे अभियोगाने शंकेपलीकडे ही बाब सिध्द करायला पाहिजे होती. अभियोग हे सिध्द करु शकला नाही की आरोपीने फिर्यादीवर ती अल्पवयीन असतांना बलात्कार केला व तिच्यावर लैंगिक व गंभीर लैंगिक हल्ला केला. आरोपी विरोधात अभियोग पक्ष गुन्हा सिध्द करु शकला नाही, म्हणून मी मुद्दा क्र.१ व २ ला नकारार्थी उत्तर देतो. वर चर्चेच्या अनुषंगाने आरोपीची निर्दोष मुक्तता करणे आवश्यक आहे, या निष्कर्षापती मी आलेलो आहो. वर चर्चेच्या आधारे मी आरोपीला निर्दोष मुक्त करीत असून खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१)** आरोपी नामे **निकेश हरिदास कराडे** यांची भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ६४(२)(आय)(एम) आणि बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२, कलम ४ व ६ चे दोषारोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २५८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२)** आरोपीने दिलेले जात मुचलके याद्धारे रद्द केले आहे.

**३)** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८०(१) अन्वये आरोपीने जमानत द्यावी असा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपीने ७ दिवसाच्या आत जमानत द्यावी. जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर नष्ट करावा.

**४)** या खटल्याचे कामकाज बंद करण्यात येते.

Sd/-
(**विश्वास सु. खोत**)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
गडचिरोली

दिनांक : २२/०४/२०२६